**नि.दि.दा.क्र. ६२/२०१५**

**नि. ११६**

**वादीकरीता साक्षीदार क्र. ३**

मी सत्य प्रतिज्ञेवर कथन करतो ते खालीलप्रमाणे की,

नाव — संपत हणमंत महाडीक,

वय – ४७ वर्षे, धंदा – शेती.

पत्ता – नांदगिरी, ता. कोरेगाव, जि. सातारा.

**<u>सरतपास वादी तर्फे ॲड. ए.एच.भोसले यांचेवतीने सुरु.</u>**

हणमंत रामा आण्णा महाडीक हे माझे वडील आहेत. मला आता निशाणी १०१ वरील खुषखरेदीपत्राचा दस्त दाखवण्यात आला. सदर खरेदीपत्र दिनांक २१/०९/१९९० रोजीचे आहे. त्यावेळी माझ्या वडीलांनी जमीन विकली होती. मी दस्त करताना वडीलांसोबत होतो. त्यांनी बोबडेवाडी येथील २६ गुंठे जमीन अशोक शिर्के यांना विकली होती. त्या दिवशी कोरेगाव येथील कचेरीमध्ये दस्त झाला होता. अशोक शिर्के यांनी हणमंत रामा आण्णा महाडीक यांना कोरेगाव येथे पैसे दिले होते. त्यानंरत दस्त तयार केला. सदर दस्त सर्वांना वाचून दाखवण्यात आला होता. रामा, आण्णा व रामचंद्र ही तिनही नावे माझ्या आजोबांची आहेत. मी माझ्या वडीलांची सही ओळखतो. सदर दस्तावर हणमंत रामा आण्णा महाडी यांची सही आहे. त्यावर साक्षीदार म्हणून विठ्ठल बळवंत महाडीक व ज्ञानदेव जगदाळे यांच्या सहया आहेत. सदर दस्तातील मजकूर खरा व बरोबर आहे. खरेदीखतानंतर जमीनीचा ताबा माझ्या वडीलांनी अशोक शिर्के यांना दिला होता.

**सरतपास पूर्ण**

**<u>उलटतपास प्रतिवादीतर्फे ॲड. एम.एस.शेडगे यांच्यातर्फे सुरु–</u>**

माझी जन्मतारीख ०१/१०/१९७६ आहे. मला दोन भाऊ आहेत. माझे

वडील १६/०६/२०२३ रोजी वारले. सदरचा व्यवहार रक्कम रुपये ५२,०००/– ला झाला. व्यवहार करतेवेळी मी सोबत होतो. व्यवहार करताना अशोक शिर्के, रघुनाथ शिर्के, भगवान शिर्के, माझे वडील, मी व माझे दोन भाऊ उपस्थित होते. हे म्हणणे खरे आहे की त्यानंतर दस्त करण्याकरीता आम्ही सर्वजन कचेरीत गेलो. पैसे आम्हाला कोरेगाव येथे दिले. मी दस्त वाचून पाहिला होता. पैसे दस्त झाल्यानंतर दिले. हे म्हणणे खरे नाही की दस्त करताना व वडील सही करताना मी प्रत्यक्ष त्या ठिकाणी उपस्थित नव्हतो. हे म्हणणे खरे नाही की वडीलांना सही करताना मी पाहिलेले नाही. दस्तामध्ये मी तुमच्याकडून गावी आठ दिवसांपूर्वी लोकांची देणे देण्याकरीता रक्कम रुपये २४,०००/– घेतले आहेत असा नमुद केलेला मजकूर बरोबर आहे. पूर्व बाजूची मिळकत विकलेली आहे. हे म्हणणे खरे नाही की दस्ताच्या वेळी मी प्रत्यक्ष हजर नव्हतो. हे म्हणणे खरे नाही की अशोक शिर्के यांनी सांगितल्यामुळे मी जबाब देण्यासाठी आलो आहे. हे म्हणणे खरे नाही की मी आज देखील अशोक शिर्के याच्याबरोबर आलो आहे. हे म्हणणे खरे नाही की माझ्या समक्ष वडीलांनी सही केलेली नसून मी आजरोजी खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास पूर्ण
फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्वीकृत

कोरेगाव
दि. १०/०४/२०२४

**(ए. ए.पाचरणे )**
सह दिवाणी न्यायाधीश, कोरेगाव.